अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
१३.०८.२०२६

वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १९४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

# विरोधक पळपुटे, संसदेत चर्चा करायची त्यांच्यात हिम्मत नाही!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हल्लाबोल

## चर्चा होऊ दिली असती तर त्यांचे पितळ उघडे पडले असते

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – 'विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये संसदेत समोरासमोर चर्चा करण्याची हिंमत नाही. ते पळपुटे आहेत. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानावर जर विरोधकांचा खरोखरच विश्वास असता, तर त्यांनी गोंधळ घालण्याऐवजी संसदेत चर्चा करून दाखवली असती', असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केला.

संसदेत चर्चा झाली असती तर विरोधकांचे पितळ उघडे पडले असते, म्हणूनच त्यांनी जाणीवपूर्वक चर्चेपासून पळ काढल्याचा टोलाही त्यांनी या वेळी लगावला. मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, विरोधक सातत्याने संविधानाचा आणि लोकशाहीचा दाखला देत असतात; मात्र संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही व्यवस्थेतील सर्वात सर्वोच्च आणि महत्त्वाचे व्यासपीठ हे संसद आहे. संसदेतील अर्थपूर्ण चर्चा हे लोकशाहीचे प्रमुख अंग आहे.

परंतु, विरोधक या चर्चेला घाबरत आहेत, कारण संसदेत चर्चा झाल्यास त्यांचा दुटप्पी आणि दुहेरी चेहरा संपूर्ण देशाच्या जनतेसमोर येईल, अशी भीती त्यांना सतावत आहे. संसदेत चर्चा झाली, तर झारखंडचा मुद्दा उपस्थित होईल. तेथे त्यांनी घेतलेल्या भूमिकेचे आणि केलेल्या कृत्यांचे उत्तर त्यांना जनतेला द्यावे लागेल. या प्रश्नांची उत्तरे देणे टाळण्यासाठीच विरोधकांनी संसदेतून पळ काढण्याची भूमिका घेतली,' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सुरुवातीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे या विषयावर उत्तर देत नसल्याचे कारण पुढे करत विरोधकांनी चर्चेला नकार दिला होता. मात्र, स्वतः गृहमंत्री अमितभाई शहा यांनी संसदेत उत्तर देण्यास आपण तयार असल्याचे स्पष्ट केल्यानंतरही हे पळपुटे मागे हटले. हा संविधानाचा आणि लोकशाहीचा अपमान आहे.

विरोधकांना देशातील तरुणांशी, त्यांच्या रोजगाराशी आणि शिक्षणाशी काहीही देणेघेणे राहिलेले नाही. त्यांना संसदेत गोंधळ घालायचा आहे आणि टीव्हीसमोर चमकून प्रसिद्धी मिळवायची आहे. लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराचा असा राजकीय वापर करण्यापेक्षा दुसरे मोठे दुर्दैव असू शकत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षांचा समाचार घेतला.

# पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी लोकसभेचं कामकाज फक्त एका मिनिटात संपलं

## वंदे मातरम होताच कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी, लोकसभेचे कामकाज केवळ एक मिनिट चालले.

सभापती ओम बिरला यांनी वंदे मातरम गाण्याचा आदेश दिला आणि त्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले. पीएम मोदी–शाह, संपूर्ण मंत्रिमंडळ आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी लोकसभेत उपस्थित होते. दुसरीकडे, आज (१३ ऑगस्ट) संसद परिसरात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांनी आंदोलन केले.

२० जुलै रोजी अधिवेशन सुरू झाल्यापासून, जंतर मंतर येथील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाई आणि राम मंदिरातील लुटीवरून विरोधी पक्षांनी हल्लाबोल केला आहे. दरम्यान, झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या विरोधात एनडीएच्या खासदारांनी आंदोलन केले. दरम्यान, राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी उत्तराखंडमधील हल्द्वानीत त्यांच्या कार्यक्रमानंतर झालेल्या शुद्धीकरणाचा मुद्दा उपस्थित केला. सभागृहात एमएमडीआर दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले. लोकसभेच्या ११४ तासांपैकी ९६ तास कामकाज नाही लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात १९ बैठका झाल्या. सभागृहाचे कामकाज साधारणपणे सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत चालते.

दुपारी १ ते २ या वेळेत जेवणाची सुट्टी असते. याचा अर्थ, दिवसाला अंदाजे ६ तासांचे कामकाज चालते. यानुसार, १९ बैठकांमध्ये अंदाजे ११४ तासांचे कामकाज होणे अपेक्षित होते, परंतु केवळ सुमारे १७ तास आणि ३० मिनिटांचेच कामकाज झाले. याचा अर्थ, अंदाजे ९६ तास आणि ३० मिनिटांचे कामकाज कमी झाले. २०२५ चे पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत झाले.

## थोडक्यात

### कोठडीमुळे कामावर गैरहजर राहिलेल्या कर्मचाऱ्याला पगार नाही

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – गंभीर फौजदारी गुन्ह्यात नाव आल्यामुळे आणि पोलीस कोठडीत जावे लागल्यामुळे कामावर गैरहजर राहिलेल्या कर्मचाऱ्याला पूर्ण १० वर्षांचा थकीत पगार देण्यास उच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. स्वतःच्या कृत्यामुळे कायदेशीर अडचणीत सापडलेल्या कर्मचाऱ्यासाठी कंपनीला आर्थिक शिक्षा देणे पूर्णपणे अयोग्य ठरेल, असे निरिक्षण न्यायालयाने नोंदवले. न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. 'नोर्ड ड्राईव्ह सिस्टीम्स'मध्ये काम केलेल्या विठ्ठल म्हस्के यांनी थकीत पगार देण्यासंदर्भात कंपनीला निर्देश देण्याची विनंती करीत न्यायालयात दाद मागितली.

# अमरावतीच्या मेळघाटातील निवासी आश्रमशाळेमध्ये भुतांची अफवा

## अफवेने घाबरलेल्या ६०० हून अधिक मुलींनी सोडले वसतिगृह

## आरोग्य पथकाचा खुलासा : भूतबाधा नसून 'हिस्टेरिया'चा प्रकार

## शिक्षण थांबू नये म्हणून विद्यार्थिनींना पुन्हा शाळेत आणण्याचे प्रयत्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**अमरावती** – जिल्ह्याच्या मेळघाटातील धारणी तालुक्यातील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना नुकत्याच विषबाधा झाल्याचे प्रकरण ताज असतानाच, आता मेळघाटातीलच चिखलदरा तालुक्यातील डोमा येथील आदिवासी शासकीय आश्रम शाळेत मुलींना भूतबाधा झाल्याच्या अफवेने मुलींनी शाळा सोडल्याचा प्रकार पुढे आलाय. सात ते आठ दिवसांपूर्वी डोमा येथील आदिवासी आश्रम शाळेतील १५-१६ विद्यार्थिनी अचानक हसायला लागल्या, रडायला लागल्या, काहींना घुंगरूचे आवाज यायला लागले, ही बाब वस्तीगृहाच्या अधीक्षिका यांच्या लक्षात येतात त्यांनी मुख्याध्यापकांच्या लक्षात आणून दिली. मात्र दुसऱ्या दिवशी ही वार्ता गावात पसरताच मुलींना भूतबाधा झाल्याची अफवा पसरली. परिणामी जवळपास ६००च्या वर मुली वस्तीगृह सोडून आपापल्या गावी निघून गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

दरम्यान, या प्रकरणाची दखल घेत आरोग्य विभागाचे पथक देखील दाखल झाले असून त्यांनी ही भूतबाधा नसून हिस्टरीया हा मानसिक आजाराचा प्रकार असल्याचा सांगितलं. सर्व विद्यार्थिनीशी आणि पालकांशी त्यांचं कौन्सिलिंग सुरू असल्याचे देखील डॉक्टरांनी सांगितलेला आहे. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नंदिनी जाधव, डॉक्टर देशमुख देखील मुंबईवरून या ठिकाणी येऊन मुलींचा कौन्सिलिंग करत असल्याची माहिती आहे. मुलींना त्यांचं समुपदेशन करून शाळेत परत आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे माहिती मुख्याध्यापक चौधरी यांनी दिली.

### डोमा गावात भुतांची अफवाच : अंधश्रद्धा निर्मूलन

"अमरावतीच्या डोमा गावातील निवासी आश्रम शाळेमध्ये भुतांची अफवा पसरल्याने या ठिकाणी विद्यार्थ्यांनी शाळा सोडून घरी पलायन केलं, त्या अनुषंगाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सर्व ज्येष्ठ कार्यकर्ते मेळघाटात गेल्या तीन दिवसापासून तळ ठोकून आहेत. भूत वगैरे असं काही नसतं. विद्यार्थ्यांनी कुठलेही मनात शंका न बाळगता पुन्हा आपल्या शाळेमध्ये जाव, असं आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ज्येष्ठ सदस्या नंदिनी जाधव यांनी केला आहे.

# सातबारावर नाव नसलेल्या शेतकऱ्यांना रेकॉर्डवर आणणार : महसूलमंत्र्यांचे आदेश; कर्जमाफी, शासकीय योजनांचा मिळणार लाभ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर नाहीत किंवा इतर अधिकारात ज्यांच्या नावांची नोंद नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना रेकॉर्डवर आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचा 'ॲग्रीस्टॅक' मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना कर्जमाफी आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे. यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.

मंत्रालयात महसूल मंत्र्यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला मत्स्योद्योग मंत्री नितेश राणे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार निलेश राणे आणि आमदार दीपक केसरकर, महसूल व सहकार व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. राज्यामध्ये सध्या तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचे 'ॲग्रीस्टॅक' निघत नसल्याची गंभीर बाब समोर आली होती. यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी होत्या. राज्यात सुमारे ५० हजार शेतकरी मयत आहेत, ज्यांच्या नोंदी अद्ययावत नाहीत.१० हजार प्रकरणांमध्ये जमीन वडिलांच्या नावे असून, मुलाचे नाव अद्याप सातबारावर लागलेले नाही. शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या 'कबुलायतदार' जागांवर सरकारचे नाव लावण्यात आले आहे.

# कुंभमेळा बनावट वर्क ऑर्डर, ७० कोटींचे कंत्राट

## गिरीश महाजन : आरोपी नातेवाईक असला तरी कडक कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जळगाव** – यंदा आपल्या नाशिकमध्ये होत असलेल्या कुंभमेळा कामाच्या संदर्भात बनावट वर्क ऑर्डर काढून काही जणांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मंत्री गिरीश महाजन यांच्या नात्यातील तनय महाजन याला नाशिक पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

तनय महाजन याच्या अटकेनंतर तनयचे वडील अनंत महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. तर, गिरीश महाजन यांनीही तनय हा माझा दूरचा नातेवाईक असून त्याच्यावर यापूर्वी काही गुन्हे दाखल असल्याचं म्हटलं. तसेच, या प्रकरणात नातेवाईक असो किंवा इतर कोणी, कोणाचीही हयगय केली जाणार नाही, दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असे गिरीश महाजन कुंभमेळा प्राधिकरण अध्यक्ष यांच्या बनावट सहीने तब्बल ७० कोटी रुपयांचे कंत्राट मिळवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



# प्रसूतीकळांनी विव्हळणाऱ्या महिलेकडे दुर्लक्ष, डॉक्टरकडून नर्सला छत्रीने मारहाण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**रायगड** – पेण येथील उपजिल्हा रुग्णालयात एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रसूतीकळांनी विव्हळत असलेल्या एका गरोदर महिलेची वेळेत तपासणी न करता वैद्यकीय हलगर्जीपणा केल्याचा गंभीर आरोप डॉक्टरांवर करण्यात आला आहे. इतकेच नव्हे, तर रुग्णाला टाके घालण्याचे काम करण्यास नकार दिल्याच्या रागातून संबंधित स्त्रीरोग तज्ज्ञाने ऑनड्युटी असणाऱ्या नर्सला छत्रीने मारहाण करत शिवीगाळ केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी डॉक्टरविरुद्ध पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गौरी देवजी कडू या गरोदर महिला प्रसूतीसाठी पेण उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. त्या प्रसूतीकळांनी व्याकूळ झालेल्या असताना ऑनड्युटी नर्सने स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर कृष्णा सोनावणे यांच्याशी फोनवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, डॉक्टरांशी संपर्क न झाल्याने अखेर लेखी कॉल पाठवण्यात आला. आरोपानुसार, लेखी कॉल देऊनही डॉक्टर रुग्णालयात वेळेत उपलब्ध झाले नाहीत. उलट त्यांनी रुग्णाला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला.

# 'डॉमिनोज'च्या ४ दुकानांचे परवाने निलंबित

## मुंबईतील तीन तर कराडमधील एका शाखेचा समावेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मुंबईतील डॉमिनोज पिझ्झाच्या तीन आउटलेटचे अन्न व्यवसाय परवाने निलंबित केले आहेत. मुंबईतील विलेपार्ले, बोरिवली आणि घाटकोपर येथील शाखांचा यात समावेश आहे.

याशिवाय कराड येथील डॉमिनोजच्या एका आउटलेटवरही कारवाई करण्यात आली आहे. ज्युबिलंट फूडवर्क्स लिमिटेडकडून या शाखा चालवल्या जातात. त्यांमध्ये स्वच्छता, अन्नसाठवणूक आणि दैनंदिन कामकाजात अनेक त्रुटी आढळून आल्या. घाटकोपर पश्चिम येथील लालबहादूर शास्त्री मार्गावरील आर-सिटी मॉलमधील डॉमिनोज शाखेत सर्वाधिक त्रुटी आढळल्या. तपासणीदरम्यान या ठिकाणी किड्यांचा प्रादुर्भाव असल्याचे निदर्शनास आले. तसेच प्रभावी कीटकनियंत्रण व्यवस्था आणि त्यासंबंधी आवश्यक नोंदी उपलब्ध नसल्याचे आढळले. विलेपार्ले पश्चिम येथील एस.व्ही. रोडवरील डी.जे. रोड कॉर्नरजवळील दुकान क्रमांक ६, ८ आणि १० येथे असलेल्या डॉमिनोज शाखेचा परवानाही निलंबित करण्यात आला.

## आर.जी. देशमुख कृषी विद्यालयात

# बक्षीस वितरण व शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम वाठोडा येथील आर.जी. देशमुख कृषी विद्यालयात नुकताच संपन्न झाला.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अजय देशपांडे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून राजकुमार मांडे, विनोद उईके, संदीप नांदणे, भारत ठाकरे, किशोर उमक, किशोर चोबितकर, तेजराज ठाकरे, संगीता बारस्कर, वैशाली धुर्वे आदी पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले तसेच विद्यालयातील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, नोटबुक, कंपास पेटी व शालेय पोशाख इत्यादी शालेय साहित्याचे वाटप सुद्धा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अजय देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन जी.जी.देशमुख व व्ही.एम.बागडे यांनी तर पि.के.भुजाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# रक्षाबंधनासाठी वरूड पोस्ट ऑफिसची खास 'राखी मेल' सुविधा

## स्पीड पोस्टने राखी पाठविण्यावर १० टक्के सवलत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय डाक विभागाने नागरिकांसाठी विशेष 'राखी मेल' सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. बहिणींना देशाच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या भावापर्यंत राखी सुरक्षित आणि वेळेत पाठविता यावी, यासाठी स्पीड पोस्टद्वारे पाठविण्यात येणाऱ्या राखी मेलवर १० टक्के विशेष सवलत देण्यात येत आहे.

वरुड पोस्ट ऑफिसमध्येही नागरिकांसाठी या विशेष सेवेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राखी, शुभेच्छा संदेश आणि भावंडांमधील प्रेमाचे नाते सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी नागरिकांनी इंडिया पोस्टच्या या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वरूड पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर हेमंत शिंगरवाडे यांनी केले आहे.

**आकर्षक 'राखी कव्हर' उपलब्ध** – रक्षाबंधनानिमित्त पोस्ट ऑफिसमध्ये आकर्षक 'राखी कव्हर' उपलब्ध करुन देण्यात आले आहे. राखी पाठविताना लिफाफ्याच्या पुढील भागावर 'राखी मेल' असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे राखी मेलची योग्य प्रकारे हाताळणी व वितरण करण्यास मदत होणार आहे.

**स्पीड पोस्टमुळे राखी वेळेत पोहोचणार** – राखी वेळेत आणि सुरक्षितपणे भावापर्यंत पोहोचविण्यासाठी स्पीड पोस्ट ही जलद व विश्वासार्ह सेवा आहे. या सेवेमध्ये ऑनलाइन ट्रॅकिंग तसेच घरपोच वितरणाची सुविधाही उपलब्ध असल्याने देशाच्या विविध भागांत राहणाऱ्या भावंडांना रक्षाबंधनाचा प्रेमाचा धागा वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे.

'रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा सण आहे. या सणानिमित्त आपल्या भावंडांपर्यंत राखी आणि प्रेमाचा संदेश पोहोचविण्यासाठी नागरिकांनी इंडिया पोस्टच्या 'राखी मेल' आणि स्पीड पोस्ट सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा', असे आवाहन पोस्टमास्तर हेमंत शिंगरवाडे यांनी केले.

रक्षाबंधनाच्या आनंदात सहभागी होताना नागरिकांनी जवळच्या पोस्ट ऑफिसला भेट देऊन आपली राखी वेळेत स्पीड पोस्ट करावी, असे आवाहन वरुड पोस्ट ऑफिसच्या वतीने करण्यात आले आहे.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |

## राजुरा बाजारच्या जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या

# चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ४ विद्यार्थीनी पात्र

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – वर्ग चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा राजुरा बाजारच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवलेले आहे. या परीक्षेमध्ये एकूण १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रियंका विश्वास गुल्हाने, तेजश्री ज्ञानेश्वर दापुरकर, स्वरा प्रकाश बनके, प्रिया हरीश बेले या विद्यार्थिनी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या आहेत. श्रावणी भोंडे, कार्तिक राऊत, नमन गुडधे, माही गुल्हाने, हर्षिका सुरजुसे, मानव काकडे, माही राऊत, अस्मिता तायवाडे, प्रांजली पवार, हिमांशु बिसांद्रे, युवानी पाटील, आनंद जावळे, आदर्श गुडधे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका तसेच वर्गशिक्षिका सुनंदा कुकडे, सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# गुलाबराव ढोरे यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – मुळचे जरुड येथील रहिवाशी व सद्या: पाठकवाडी परिसरात राहात असलेले शहरातील न.प.कॉम्प्लेक्स परिसरातील भाग्यलक्ष्मी एंटरप्रायजेसचे संचालक मंगेश ढोरे यांचे वडिल गुलाबराव बाळकृष्ण ढोरे यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी आज दुपारच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शहरातील केदारेश्वर मोक्षधाम येथे उद्या १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या मागे विलास व मंगेश ढोरे अशी २ मुले, २ मुली, सुना, नात वंड असा बराच मोठा आप्तपरिवार असून त्यांच्या निधनाने शहरासह जरुड गावामध्ये शोक व्यक्त केल्या जात आहे.

## एकलव्य स्पोर्ट्स अकादमीच्या

# दोघांची राज्यस्तरीय ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी निवड



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे पार पडलेल्या ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये एकलव्य स्पोर्ट्स अकादमी वरुडच्या दोन विद्यार्थिनींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. येथील विद्यार्थिनींनी एथलेटिक्स क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यामध्ये दीप्ती संजय कासे ८०० मीटर व ३००० मीटर मध्ये द्वितीय क्रमांक, गीत वानखडे १०० मीटर द्वितीय क्रमांक व २०० मीटरमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळा, पालक तसेच प्रशिक्षकांचे नाव अभिमानाने उंचावले आहे. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींची राज्यस्तरीय अथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशासाठी मुख्य क्रीडा प्रशिक्षक ओम कासदेकर तसेच विद्यार्थी क्रीडा प्रशिक्षक विक्कीसिंग अंद्रेले, कोमलसिंह बघेल (यवतमाळ) यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय येथे

# विश्व बंधुत्व रक्तदान अभियान अंतर्गत २१ ला रक्तदान शिबिर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






**वरुड** – परम आदरणीय राजयोगिनी दादी प्रकाशमणीजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ विश्व बंधुत्व रक्तदान अभियान २०२६ अंतर्गत येत्या २१ ऑगस्ट रोजी प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय वरुड येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करुन सहकार्य करण्याचे आवाहन सेंटर संचालिका बिंदु दीदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

एक बुंद रक्त–अनेक जीवनों की आशा या बोधवाक्यासह प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय वरुड तर्फे या सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत शिवशक्ती भवन, विष्णु मंगल कार्यालयाच्या मागे, राजुरा रोड वरुड येथे पार पडणार आहे.

ज्ञान, योग आणि नि:स्वार्थ सेवाभावाच्या माध्यमातून संपूर्ण मानवतेला एका सुत्रात बांधणे, करुणा आणि बंधुभाव वृद्धींगत करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. रक्तदान हे केवळ एखाद्याचे प्राण वाचवणारे 'महादान' नसून ते रक्तदात्याच्या स्वत:च्या आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर ठरते. तज्ञांच्या मते रक्तदान केल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते, नियमित रक्तदान केल्याने शरीरातील अतिरिक्त लोहाचे प्रमाण नियंत्रित राहते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.

रक्तदानानंतर शरीर लगेचच नव्या रक्तपेशी तयार करण्याचे काम सुरू करते, ज्यामुळे शरीरात नवीन आणि ताजी ऊर्जा निर्माण होते. शरीरातील लोहाचे प्रमाण संतुलित राहिल्याने यकृत व इतर अवयवांच्या कॅन्सरचा धोका कमी होण्यास मदत होते. रक्तदानपूर्वी रक्तदात्याची हिमोग्लोबिन, रक्तदाब, वजन व इतर मूलभूत आरोग्य तपासणी केली जाते. रक्तदानामुळे शरीरातील कॅलरीज बर्न होण्यास मदत होते, जे वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपयुक्त ठरते. 'माझ्या रक्ताने कोणाचा तरी जीव वाचला' ही भावना मानवी मनाला आध्यात्मिक शांती, सकारात्मकता आणि आनंद देते. ज्ञान, योग, ध्यान आणि रक्तदान मानवाची सर्वोच्च सेवा हा संदेश देत प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय वरुड परिवाराने सर्व नागरिक, युवक आणि सामाजिक संस्थांना या महादानात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

तुमचा एक लहानसा पुढाकार आणि रक्ताचा एक थेंब एखाद्याच्या आयुष्यात नवीन आशेचा किरण पसरवू शकतो. करीता या रक्तदान शिबीरात जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करून सहकार्य करण्याचे आवाहन प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय वरुडच्या संचालिका बिन्दु दीदी, भारतीदीदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकातुन केले आहे.

# संपादकीय

**बोलण्यापूर्वी विचार करा आणि करण्यापूर्वी नियोजन करा.**


## सुशिक्षित बेरोजगारी : तरुणाईसमोरील गंभीर आव्हान

शिक्षण हे व्यक्तीच्या विकासाचे, प्रगतीचे आणि उज्ज्वल भविष्याचे साधन मानले जाते. मात्र आज शिक्षण पूर्ण करूनही हाताला काम न मिळणे ही मोठी सामाजिक आणि आर्थिक समस्या बनली आहे. पदवी, पदव्युत्तर शिक्षण, विविध व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करूनही हजारो तरुण नोकरीच्या शोधात भटकताना दिसतात. त्यामुळे 'सुशिक्षित बेरोजगारी' हा केवळ रोजगाराचा प्रश्न राहिलेला नसून तो देशाच्या विकासाशी जोडलेला गंभीर विषय बनला आहे. आजच्या काळात पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी मोठा खर्च करतात. मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे, चांगली नोकरी मिळवावी आणि स्थिर आयुष्य जगावे, अशी त्यांची अपेक्षा असते. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी स्पर्धा करताना तरुणांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा मर्यादित असतात, तर खासगी क्षेत्रात अनुभव, कौशल्य आणि विविध निकषांची मागणी केली जाते. परिणामी अनेक तरुणांच्या हातात पदवी असते; परंतु रोजगार नसतो. सुशिक्षित बेरोजगारीचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षण आणि रोजगाराच्या बाजारपेठेतील कौशल्यांची गरज यांच्यातील दरी. अनेक अभ्यासक्रमांमध्ये सैद्धांतिक ज्ञानावर भर दिला जातो; मात्र प्रत्यक्ष कामासाठी आवश्यक कौशल्ये, तंत्रज्ञानाचे ज्ञान, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता आणि व्यावसायिक अनुभव यांचा पुरेसा विकास होत नाही. त्यामुळे पदवीधरांची संख्या वाढत असली तरी उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. दुसरीकडे, सरकारी नोकरीकडे असलेले आकर्षणही मोठे आहे. सुरक्षित नोकरी, नियमित वेतन आणि सामाजिक प्रतिष्ठेमुळे लाखो तरुण काही मोजक्या पदांसाठी प्रयत्न करतात. वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षा देऊनही अपेक्षित यश मिळाले नाही, तर त्यांच्या वयाचा आणि वेळेचा मोठा भाग निघून जातो. त्यामुळे सरकारी नोकरीबरोबरच खासगी क्षेत्र, स्वयंरोजगार, उद्योजकता आणि कौशल्याधारित व्यवसायांकडेही तरुणांनी सकारात्मक दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. सुशिक्षित बेरोजगारीचा परिणाम केवळ बेरोजगार व्यक्तीवर होत नाही, तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर आणि समाजावर होतो. रोजगाराच्या अभावामुळे आर्थिक स्वावलंबन लांबते. तरुणांच्या आत्मविश्वासावर परिणाम होतो आणि त्यांच्या भविष्यासंदर्भात असुरक्षितता निर्माण होते. दुसरीकडे, देशाने शिक्षणावर केलेली मोठी गुंतवणूकही अपेक्षित आर्थिक उत्पादनात रूपांतरित होत नाही. या समस्येवर उपाय म्हणून रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणारी धोरणे आवश्यक आहेत. उद्योगांना चालना देणे, स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करणे, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण भागात कौशल्याधारित उद्योग उभारणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर शिक्षणपद्धतीतही बदल करून विद्यार्थ्यांना केवळ पदवी देण्याऐवजी रोजगारक्षम बनविण्यावर भर दिला पाहिजे.




# ग्रामीण मातीतून शहरी जीवनाकडे प्रेरणादायी प्रवास...

अत्यंत प्रेमळ, विनम्र, कष्टाळू आणि सतत कार्यमग्न राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून विलास वासुदेवराव देठे यांची सर्वत्र ओळख आहे. अत्यंत खडतर परिस्थितीतून वाटचाल करीत आपल्या कष्टाच्या बळावर जीवनाला नवी दिशा देत ग्रामीण भागातून शहरी जीवनाकडे केलेला त्यांचा प्रवास निश्चितच प्रेरणादायी आहे.



अकोला जिल्ह्यातील अंतरी या छोट्याशा खेडेगावात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर विलास देठे यांनी जीवनाच्या संघर्षमय वाटचालीला सुरुवात केली. उदरनिर्वाहासाठी कामाच्या शोधात त्यांनी राजस्थानपर्यंत प्रवास केला. रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात मोठमोठे ट्रक सराईतपणे चालविण्यापासून ते विविध प्रकारची कष्टाची कामे त्यांनी प्रामाणिकपणे केली. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी कष्ट करण्याची तयारी आणि कोणतेही काम कमीपणाचे न मानण्याची वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ताकद राहिली.

काळ पुढे सरकत गेला आणि नियतीने त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा दिली. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत शिपाई म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या संधीचे सोने करीत त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या केवळ नोकरी म्हणून न पाहता अत्यंत निष्ठेने आणि आपुलकीने पार पाडल्या.

शाळेच्या कामानिमित्त कधी शिक्षण विभागात, कधी जिल्हाधिकारी कार्यालयात, तर कधी वेतन पथकाच्या कार्यालयात जाऊन आवश्यक ती कामे करून देताना त्यांनी आपल्या कामातील तत्परता, प्रामाणिकपणा आणि विश्वासार्हता सिद्ध केली. सोपविलेल्या कामापेक्षा अधिक काम करण्याची त्यांची वृत्ती आणि सर्वांशी आपुलकीने वागण्याचा स्वभाव यामुळे ते विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच विविध कार्यालयांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्येही प्रिय झाले.

शाळेतील नियमित लिपिक नंदकिशोर पेटकर सेवानिवृत्त झाल्यानंतर शिपाई म्हणून असलेल्या आपल्या नियमित जबाबदाऱ्या सांभाळतानाच लिपिक पदाशी संबंधित अनेक कामेही विलास देठे आनंदाने आणि निष्ठेने पार पाडत आहेत. विद्यार्थी व पालकांच्या कामांमध्येही कोणताही भेदभाव न करता आवश्यक ती मदत करण्याची त्यांची सदैव तयारी असते. आपले काम मनापासून आणि इतरांच्या उपयोगी पडेल अशा पद्धतीने करायचे हा त्यांच्या कार्यशैलीचा जणू मूलमंत्रच आहे.

नोकरीच्या व्यापातून आपल्या कुटुंबाकडेही त्यांनी तितक्याच जबाबदारीने लक्ष दिले. आपल्या एकुलत्या एक चिरंजीव हर्ष याला अथक परिश्रमातून इंजिनियर बनवून त्यांनी पालक म्हणून आपली जबाबदारीही यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यांच्या या कौटुंबिक वाटचालीत पत्नी व कुटुंबीयांचीही मोलाची साथ लाभली आहे.

सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्येही देठे कुटुंबीय नेहमीच उत्साहाने सहभागी होत असतात. आपल्या कॉलनीतील गणेशोत्सव असो अथवा नवदुर्गा उत्सवङ्कप्रत्येक कार्यक्रमात त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा सक्रिय सहभाग असतो. भजन-कीर्तनातील गायनाची त्यांना विशेष आवड असून संगीत आणि सांस्कृतिक उपक्रमांमधूनही ते आपला आनंद इतरांसोबत वाटत असतात.

शाळेतील नवरात्रोत्सव, गरबा, स्वातंत्र्यदिन, वार्षिक महोत्सव अथवा विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम असोत, विलास देठे विद्यार्थ्यांमध्ये अक्षरशः रमून जातात. त्यांच्यासोबत नाचणे, खेळणे, बागडणे आणि आनंदाचे क्षण अनुभवणे यात त्यांना विशेष आनंद मिळतो. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात केवळ कर्तव्यनिष्ठ कर्मचारीच नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये सहज मिसळणारा आनंदी आणि दिलखुलास माणूसही दिसून येतो.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून सुरुवात करून ग्रामीण भागातून शहरी भागाकडे येत स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न समाजातील अनेकांसाठी निश्चितच आदर्शवत आहे. कष्ट, प्रामाणिकपणा, निष्ठा, सकारात्मक दृष्टिकोन आणि माणुसकी या गुणांच्या बळावर आयुष्याला सुंदर आकार देता येतो, याचे विलास देठे हे उत्तम उदाहरण आहेत.

अशा या सेवाभावी, कर्तव्यनिष्ठ, प्रेमळ, विनम्र, दिलखुलास आणि सतत कार्यमग्न व्यक्तिमत्त्वाचे विलास देठे यांचा ११ ऑगस्ट हा वाढदिवस. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सर्व इच्छा-आकांक्षा व मनोकामना पूर्ण होवोत, त्यांना उत्तम आरोग्य, सुख, समाधान, आनंद आणि निरामय दीर्घायुष्य लाभो. तसेच त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला सदैव सुख-समृद्धी, समाधान आणि आनंद लाभो, हीच ईश्वरचरणी मनःपूर्वक प्रार्थना!

**दिलीप अमृतराव सदार**
**मुख्याध्यापक**
९०११०३२५४५

# परंपरेच्या चौकटीत जगताना हक्क, स्वातंत्र्य आणि समानतेचा संघर्ष

आदिवासी समाजाची ओळख ही निसर्गाशी असलेले घट्ट नाते, सामूहिक जीवनपद्धती, श्रमाला दिलेले महत्त्व आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरा यामुळे वेगळी आहे. या समाजव्यवस्थेत स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. शेती, जंगलावर आधारित उपजीविका, घरगुती जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यात आदिवासी स्त्रियांचा मोठा वाटा आहे. मात्र या योगदानाच्या तुलनेत त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याला, शिक्षणाला, आर्थिक स्वावलंबनाला आणि सामाजिक समानतेला अनेकदा मर्यादा येतात. पितृसत्ताक विचारसरणीचा प्रभाव आदिवासी समाजातील स्त्रियांच्या जीवनावरही जाणवतो.

पितृसत्ताक पद्धती म्हणजे कुटुंब आणि समाजातील महत्त्वाचे निर्णय प्रामुख्याने पुरुषांच्या हातात राहणारी व्यवस्था. मालमत्ता, आर्थिक व्यवहार, विवाह, शिक्षण, कुटुंबाचे निर्णय आणि सामाजिक नेतृत्व यामध्ये पुरुषांचे वर्चस्व असणे हे तिचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. प्रत्येक आदिवासी समाजाची रचना सारखी नसते, त्यामुळे सर्व आदिवासी समाजांना एकाच चौकटीत मोजणे योग्य ठरणार नाही. काही समुदायांमध्ये स्त्रियांना तुलनेने अधिक सामाजिक स्वातंत्र्य आणि सहभाग मिळतो. तरीही आधुनिक काळात आर्थिक असमानता, शिक्षणाचा अभाव, रूढी आणि पुरुषप्रधान मानसिकता यामुळे अनेक आदिवासी स्त्रियांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो.

आदिवासी स्त्रीचे जीवन अनेक पातळ्यांवर संघर्षमय असते. पहाटेपासून घरातील कामे, पाणी आणणे, स्वयंपाक, मुलांची काळजी आणि त्यानंतर शेती किंवा मजुरीची कामे अशी तिची दिनचर्या असते. अनेकदा ती कुटुंबाच्या उत्पन्नात मोठे योगदान देते; परंतु तिच्या श्रमाला स्वतंत्र आर्थिक मूल्य किंवा निर्णयप्रक्रियेत समान स्थान मिळत नाही.

घराबाहेर काम करणाऱ्या स्त्रीला आर्थिकदृष्ट्या सक्षम मानले जाते, पण तिच्या कमाईचा वापर कसा करायचा याचा निर्णय तिच्या हातातच असेल असे नाही. शिक्षण हा या



परिस्थितीत बदल घडविणारा सर्वात प्रभावी मार्ग आहे. शिक्षणामुळे मुलींना स्वतःच्या अधिकारांची जाणीव होते, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि आत्मविश्वास वाढतो. मात्र दुर्गम भागातील शाळांची उपलब्धता, आर्थिक अडचणी, घरगुती जबाबदाऱ्या, वाहतुकीचा अभाव आणि काही ठिकाणी मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन यामुळे त्यांचे शिक्षण मध्येच थांबण्याची शक्यता असते. मुलींचे शिक्षण केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे.

आर्थिक स्वावलंबन हा स्त्रीच्या सक्षमीकरणाचा दुसरा महत्त्वाचा आधार आहे. आदिवासी स्त्रिया शेती, वनउत्पादन, पशुपालन, हस्तकला, मजुरी आणि लघुउद्योग अशा विविध क्षेत्रांत काम करतात. मात्र त्यांच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळणे, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच मिळणे आणि आर्थिक निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे. बचत गट, स्वयंरोजगार, कौशल्य प्रशिक्षण आणि महिला सहकारी संस्था यामुळे स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची मोठी संधी निर्माण होऊ शकते. पितृसत्ताक व्यवस्थेचा आणखी एक परिणाम म्हणजे निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा मर्यादित सहभाग. ग्रामसभा, स्थानिक संस्था, सामाजिक संघटना किंवा कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय घेताना स्त्रीचा आवाज समान ताकदीने ऐकला जाणे आवश्यक आहे. कायद्याने महिलांना अनेक अधिकार दिले असले तरी कायदेशीर अधिकार आणि प्रत्यक्ष सामाजिक परिस्थिती यामध्ये अनेकदा अंतर दिसते. त्यामुळे केवळ कायदे करून प्रश्न सुटणार नाही; सामाजिक मानसिकतेतही परिवर्तन घडवावे लागेल. आदिवासी स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहताना त्यांच्या संस्कृतीकडेही संवेदनशीलतेने पाहणे गरजेचे आहे. विकासाच्या नावाखाली त्यांच्या परंपरा, भाषा, ज्ञान आणि सांस्कृतिक ओळख दुर्लक्षित करता कामा नये. स्त्रीसक्षमीकरण म्हणजे तिच्यावर बाहेरून एखादी जीवनपद्धती लादणे नव्हे; तर तिला स्वतःच्या आयुष्याबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे होय. तिच्या परंपरेचा सन्मान राखत शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि न्यायाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. दुर्गम भागात आरोग्यसेवा सहज उपलब्ध नसल्यामुळे महिलांना अनेकदा मूलभूत आरोग्य सुविधांपासून वंचित राहावे लागते. गर्भवती महिला, किशोरवयीन मुली आणि लहान मुलांच्या मातांसाठी नियमित आरोग्य तपासणी, पोषण, स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृती आवश्यक आहे. निरोगी स्त्री ही कुटुंबाच्या आणि समाजाच्या आरोग्याचा मजबूत आधार असते.

आज आदिवासी समाजातील अनेक महिला शिक्षण, प्रशासन, राजकारण, सामाजिक कार्य, कला, क्रीडा आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत पुढे येत आहेत. त्यांच्या यशातून हे स्पष्ट होते की संधी मिळाल्यास आदिवासी स्त्री कोणत्याही क्षेत्रात सक्षमपणे काम करू शकते. त्यामुळे तिच्याकडे केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी व्यक्ती म्हणून न पाहता स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि निर्णयक्षम नागरिक म्हणून पाहण्याची गरज आहे.

पितृसत्ताक पद्धतीला बदलण्याची जबाबदारी केवळ महिलांची नाही. पुरुषांनीही या परिवर्तनात समान भागीदार झाले पाहिजे. घरातील कामांची विभागणी, मुलगा-मुलगी समानता, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, महिलांच्या निर्णयांचा आदर आणि हिंसाचाराला विरोध या गोष्टी पुरुषांनी स्वीकारल्या तर सामाजिक बदल अधिक वेगाने घडू शकतो. शेवटी, आदिवासी स्त्री ही केवळ संघर्षाचे प्रतीक नाही; ती श्रम, जिद्द, संस्कृती आणि परिवर्तनाची शक्ती आहे. तिच्या हातात घराची जबाबदारी आहे, समाजाच्या परंपरांचे संवर्धन आहे आणि भविष्यातील पिढी घडविण्याची क्षमता आहे.

त्यामुळे तिच्या श्रमाला सन्मान, विचारांना स्वातंत्र्य, शिक्षणाला संधी आणि निर्णयांना समान स्थान मिळणे ही समाजाची जबाबदारी आहे. आदिवासी स्त्री सक्षम झाली तर केवळ एक कुटुंब नव्हे, तर संपूर्ण समाज सक्षम होईल. पितृसत्ताक चौकटीत बदल घडवून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित समाजरचना उभी करणे हीच खऱ्या अर्थाने सामाजिक प्रगतीची दिशा आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# संविधान चौक नामकरणासाठी २ हजार ४ नागरिकांचे समर्थन

## एक दिवसीय स्वाक्षरी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – शहरातील तहसील कार्यालयासमोरील चौकाला 'संविधान चौक' असे अधिकृत नाव देण्यात यावे, या मागणीसाठी वरुड नगरपरिषद येथे सोमवारी एकदिवसीय स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल २ हजार ४ नागरिकांनी स्वाक्षऱ्या करुन संविधान चौक नामकरणाच्या मागणीला समर्थन दिले.

तहसील कार्यालयासमोरील चौकाला संविधान चौक असे नाव देण्यात यावे, यासाठी सुशील बेले गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. या मागणीसाठी यापूर्वी चक्काजाम आंदोलन, धरणे आंदोलन तसेच चौकाच्या नामकरणाचा फलक लावण्यासारखे विविध आंदोलनात्मक उपक्रमही करण्यात आले आहेत. मात्र, सातत्यपूर्ण पाठपुरावा करुनही अद्याप या मागणीला अधिकृत स्वरुप मिळालेले नाही.

यापूर्वी संबंधित लोकप्रतिनिधींची निवड झालेली नसल्याने नामकरणाचा अधिकृत ठराव घेण्याची प्रक्रिया पुढे जाऊ शकली नव्हती. आता नगरपरिषदेची लोकप्रतिनिधींची बॉडी अस्तित्वात आली असून निवडून आलेले लोकप्रतिनिधी कार्यरत आहेत. त्यामुळे आता कोणतीही सबब न देता नगरपरिषदेने तातडीने ठराव घेऊन तहसील कार्यालयासमोरील चौकाचे 'संविधान चौक' असे अधिकृत नामकरण करावे, अशी मागणी स्वाक्षरी अभियानाच्या माध्यमातून करण्यात आली. स्वाक्षरी अभियानातून प्राप्त झालेल्या दोन हजार चार नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन मुख्याधिकारी, नगराध्यक्ष तसेच आमदार उमेश ऊर्फ चंदू यावलकर यांना देण्यात आले.

स्वाक्षरी अभियाना वेळी सुशील बेले, मनोज लांडगे, रमेश सहारे, मनोज पतंगे, गजानन मेश्राम, विष्णू सलामे, मनोज झोडे, राहुल लांडगे, नितेश डबरासे यांच्यासह शहरातील अनेक नागरिक व संविधानप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोंदिवडे रस्त्यावरील खड्डे बुजवले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## शाळकरी मुलींच्या 'ग्राउंड रिपोर्ट'चा दणका





**कर्जत** – कर्जत तालुक्यात विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होत असल्या, तरी गावागावांतील रस्त्यांची दुरवस्था हे विकासाच्या दाव्यांची पोलखोल करत आहे. हेच वास्तव कोंदिवडे गावातील शाळकरी मुलींनी आपल्या 'ग्राउंड रिपोर्ट'मधून दाखवून दिले.

विशेष म्हणजे, या मुलींचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर स्थानिक आमदार महेंद्र थोरवे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने या समस्येची दखल घेतली. अखेर कोंदिवडे रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. कोंदिवडे परिसरातील रस्त्याची दुरवस्था ही काही दिवसांपुरती मर्यादित नव्हती. मोठमोठे खड्डे, त्यात साचलेले पाणी आणि खराब रस्त्यामुळे विद्यार्थी, गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनचालकांना दररोज त्रास सहन करावा लागत होता. शाळेत जाणाऱ्या नेहा घारे, ज्योत्स्ना आणि मानसी पवार या विद्यार्थिनींनी मात्र या समस्येकडे केवळ तक्रार म्हणून न पाहता थेट पत्रकाराची भूमिका बजावली. हातात छत्रीचा माईक आणि दप्तरातील मोबाईलचा कॅमेरा घेऊन या मुलींनी रस्त्यावर उतरून 'ग्राउंड रिपोर्ट' तयार केला. रस्त्यावरील खड्डे, त्यात साचलेले पाणी आणि नागरिकांना होत असलेला त्रास त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून मांडला.

# अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी मुदतवाढ नाही

## राज्य सरकारचा व्यावसायिक चालकांना इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – महाराष्ट्रात प्रवासी वाहतूक करणाऱ्या व्यावसायिक वाहनांच्या चालकांना व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांद्वारे ही अट अधिक स्पष्ट करण्यात आली असून मराठीचे आवश्यक ज्ञान नसलेल्या चालकाचा १५ ऑगस्टनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. त्यानंतर त्यांचा परवाना निलंबित केला जाईल, असा इशारा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी दिली.

मोटार वाहन सुधारणा नियम २०२६ अंतर्गत महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. या सुधारणांमध्ये रिक्षा, टॅक्सी तसेच इलेक्ट्रॉनिक मीटर बसविलेल्या ॲप-आधारित मोटार कॅब आणि त्यांच्या परवाना आणि अधिकृततेशी संबंधित चालक तसेच परमिटधारकांसाठी व्यावहारिक मराठीच्या ज्ञानाची अट असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. नियम २२ मध्ये बदल करून ॲप आधारित इलेक्ट्रॉनिक मीटर बसविलेल्या मोटार कॅबच्या अधिकृत चालकांसाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

परमिट नूतनीकरणासाठी व्यवहारिक मराठी आवश्यक सुधारित नियमांमधील नव्या तरतुदीनुसार, ॲप आधारित इलेक्ट्रॉनिक मीटर बसवलेल्या मोटार कॅबच्या परमिटचे नूतनीकरण करताना परमिटधारकाकडे मराठीचे ज्ञान असणे आवश्यक राहणार आहे.

### आरक्षण घेतल्याशिवाय हटणार नाही

# कराडमध्ये मनोज जरांगे-पाटील यांची गर्जना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**कराड** – मराठ्यांच्या हक्काचे आरक्षण मिळेपर्यंत आता मागे हटणार नाही. इतर समाजाच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता मराठ्यांना आरक्षण मिळिवण्यासाठी ही शेवटची आरपारची लढाई असेल. येत्या २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे पुन्हा आंदोलन सुरू करणार आहोत, अशी घोषणा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केली.

कराड तालुक्यातील पाचवड येथे मंगळवारी सायंकाळी आयोजित मराठा समाजाच्या सभेत ते बोलत होते. जरांगे-पाटील हे कराड आणि पाटण तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. जरांगे-पाटील म्हणाले की, अनेक वर्षे मराठा समाजाने राजकीय नेत्यांना मतदान करून मोठे केले; मात्र समाजाच्या प्रश्नांकडे अपेक्षित लक्ष देण्यात आले नाही. आता मराठ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या सोबत राहण्याची भूमिका समाजाने घ्यावी, मग तो कोणत्याही पक्षाचा असो. कुणबी जात प्रमाणपत्र आणि कुणबी नोंदींची तपासणी करण्याचे काम शासनाकडून सुरू होते. मात्र, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रक्रियेत अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप जरांगे-पाटील यांनी केला. शासनाच्या धरसोड धोरणामुळे मराठा समाजात असंतोष वाढत असून, त्याचे परिणाम झाल्यास शासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला. ङ्गमी कोणत्याही पक्षाचा किंवा व्यक्तीचा नाही.

# माथेरानमध्ये मोबाईल नेटवर्कचा बोजवारा

## डिजिटल व्यवहार ठप्प : दैनंदिन व्यवहारांवर परिणाम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***ठाणे*** – पावसाळा सुरू होताच माथेरानमध्ये वीज आणि पाण्याच्या समस्यांनी नागरिक व व्यावसायिक त्रस्त झाले होते. सध्या वीज आणि पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुरळीत झाला असला, तरी मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेटची समस्या मात्र दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या माथेरानमध्ये अनेक ठिकाणी मोबाईल नेटवर्क पूर्ण क्षमतेने मिळत नसल्याने नागरिक, व्यापारी आणि पर्यटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. माथेरानचा बहुतांश व्यवसाय पर्यटनावर अवलंबून आहे. हॉटेल, दुकाने, चहा-नाश्त्याच्या टपऱ्या तसेच खाद्यपदार्थ विक्रेते यांच्याकडून मोठ्या प्रमाणात णझख, ऋझरू, झहेपशझश आणि मोबाईल बँकिंगद्वारे व्यवहार केले जातात.

# 'सीजेपी'ला दिल्लीत हॉल मिळेना : भाजपचा दबाव, दीपकेंचा आरोप, बैठक रद्द करण्याची वेळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – दिल्लीतील नारायणा येथे आयोजित करण्यात आलेली 'कॉकरोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) कार्यकर्त्यांची बैठक बुधवारी अचानक रद्द करण्यात आली. सत्ताधारी भाजपकडून आलेल्या दबावामुळेच बँक्वेट हॉलच्या मालकाने ऐनवेळी बुकिंग रद्द केल्याचा खळबळजनक आरोप 'सीजेपी'चे संस्थापक अभिजित दीपके यांनी केला आहे. दिल्लीत कार्यकर्त्यांचे संमेलन घेण्यास आपल्याला रोखले जात असल्याचे सांगत दीपके म्हणाले, आम्हाला कुठेही सभा घेऊ दिली जात नाही. आसपासच्या इतर बँक्वेट हॉल चालकांनीही भीतीपोटी जागा देण्यास नकार दिला आहे.

सीजेपीला बैठकांसाठी जागा देऊ नये म्हणून लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले जात असून त्यांना धमकावले जात आहे. तुम्ही जितक्या धमक्या द्याल, तितके आम्ही अधिक मजबूत होऊ. आम्ही अशा दबावाला अजिबात घाबरणार नाही, असे दीपके म्हणाले आहे.

### महात्मा फुले महाविद्यालय येथे

# निसर्ग संवर्धनाकरीता बीजप्रसारण व वृक्षारोपण उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथील वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागठाणा परिसरात निसर्ग संवर्धनासाठी बीजप्रसारण व वृक्षारोपण उपक्रम नुकताच उत्साहात राबविण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि हरित परिसर निर्मितीची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना केवळ वृक्षारोपणाचे महत्त्व समजावून न देता बीजप्रसारण, वृक्षलागवड, रोपांचे संगोपन आणि जैवविविधता संवर्धन याबाबत प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्थानिक परिस्थितीला अनुकूल असलेल्या विविध वनस्पतींच्या बियांचे नागठाणा परिसरातील योग्य ठिकाणी प्रसारण केले. पावसाळ्यातील अनुकूल वातावरणाचा फायदा घेत या बियांपासून नैसर्गिक पद्धतीने नवीन रोपे निर्माण व्हावीत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. तसेच योग्य ठिकाणी विविध रोपांची लागवड करुन त्यांच्या भविष्यातील संगोपनाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

मानवी हस्तक्षेप, वाढते शहरीकरण, जंगलतोड आणि बदलते हवामान यामुळे नैसर्गिक अधिवासावर मोठा परिणाम होत आहे. परिणामी जैवविविधतेसमोर निर्माण झालेली आव्हाने लक्षात घेता स्थानिक वनस्पतींचे संवर्धन व त्यांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. याच उद्देशाने वनस्पतिशास्त्र विभागाने हा उपक्रम राबवून जैवविविधता संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. बीजप्रसारण ही पर्यावरणपूरक, सोपी आणि लोकसहभागातून राबविता येणारी प्रभावी संकल्पना असून, विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या माध्यमातून नागठाणा परिसरात पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश पोहोचला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेम यांचा सुंदर संगम घडून आला.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ.संजय सातपुते, डॉ.मंगेश बोबडे, डॉ.प्रांजली देशमुख व प्रा.शुभम साखरे यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमात वनस्पतीशास्त्र विभागातील एकूण ४२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

### न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# विद्यार्थी सुरक्षा व 'ऑपरेशन कवच' कार्यक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – श्री शिवाजी संस्थांतर्गत न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समिती, शाळा परिवहन समिती तसेच 'ऑपरेशन कवच' या उपक्रमाचे आयोजन नुकतेच शाळेच्या प्रांगणात करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणुन ठाणेदार अशोक जाधव, पोलीस उपनिरीक्षक मोनिका मंडळे, पं.स.विस्तार अधिकारी दशरथ गाडगे, शहापूरचे मुख्याध्यापक मनीष दिघेकर, नगरसेवक तारेश देशमुख, मुन्ना तिवारी, डॉ.श्रीकृष्ण मानकर, राम पांडे तसेच ज्येष्ठ शिक्षिका बढे उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात ठाणेदार अशोक जाधव यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा गैरवापर, सायबर क्राईम, व्यसनाधीनता, हेल्मेटचा वापर आणि सुरक्षितते बाबत मार्गदर्शन केले. विस्तार अधिकारी दशरथ गाडगे यांनी विद्यार्थी सुरक्षा व शाळेतील भौतिक सुविधांचे महत्त्व स्पष्ट केले. मुख्याध्यापक मनीष दिघेकर यांनी आदर्श विद्यार्थी घडविण्यासाठी पालक, विद्यार्थी आणि शाळा या त्रिसूत्रीचा समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा अतिवापर टाळणे, व्यसनांपासून दूर राहणे, हेल्मेटचा नियमित वापर करणे, रस्त्याने चालताना वाहतूक नियमांचे पालन करणे याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, वाहतूक नियम, व्यसनमुक्ती आणि वैयक्तिक सुरक्षिततेबाबत जागरुकता निर्माण झाली. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




# एसटीच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी दिली माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि डिजिटल प्रवासाचा अनुभव देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्डला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १२ ऑगस्टपर्यंत राज्यात तब्बल १ कोटी १ लाख ७३ हजार ८३८ प्रवाशांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी ६४ लाख ९१ हजार ६५ कार्डे सक्रिय झाली आहेत. एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या माध्यमातून एसटी प्रवासातील तिकीट व्यवहार अधिक सुलभ आणि कॅशलेस



करण्याच्या दिशेने महामंडळाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. पहिल्या टप्प्यात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात येत आहे. येत्या १ सप्टेंबरपासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या पात्र लाभार्थ्यांनी लवकरात लवकर एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी करावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी ही केवळ प्रवासाची सेवा नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाशी जोडलेली लोकवाहिनी आहे.

# महाराष्ट्रातील विद्यार्थी आंदोलकांना मोठा दिलासा

## नीट पेपरफुटी प्रकरणातील गुन्हे मागे घेण्यासाठी मुदतवाढ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्रातील विद्यार्थी, तरुण आंदोलनकर्त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नीट पेपरफुटी आणि दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनात विद्यार्थ्यांना झालेल्या मारहाणीचा निषेध म्हणून मुंबईसह राज्यभर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी, तरुण आणि इतर आंदोलनकर्त्यांना न्यायालयीन कारवाईतून दिलासा देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, परीक्षा पेपरफुटी व इतर मागण्यांसाठी झालेल्या आंदोलनांमधील विद्यार्थ्यांवरील व तरुण आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची मुदत ३१ मार्च २०२७ पर्यंत वाढवण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील गंभीर गुन्हे नसलेल्या विद्यार्थी आंदोलकांवर कारवाई न करण्याचे व गुन्हे मागे घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य सरकारने सुद्धा या विद्यार्थ्यांची गुन्हे मागे घेण्यास संदर्भातला निर्णय घेतला. राजकीय पक्ष व सामाजिक संघटना यांच्याकडून सार्वजनिक हिताच्या व वेगवेगळ्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी घेराव घालणे, मोर्चे काढणे, निदर्शने करणे इ. स्वरुपाचे आंदोलनाचे मार्ग अनुसरले जातात. त्यामुळे त्यांच्याविरुध्द कायद्याचे उल्लंघन केल्याने गुन्हे दाखल होऊन, तपासानंतर न्यायालयात दोषारोपपत्रे दाखल केली जातात.

# महिलेच्या विनयभंग प्रकरणी

## ईसमास अटक : चांदस येथील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महिलेच्या विनयभंग प्रकरणी वरुड पोलिसांनी चांदस येथील लिलाधर किसन वंजारी रा.चांदस याचे विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यास अटक केली आहे.

फिर्यादी व आरोपी असून वेगवेगळया गावात राहातात. फिर्यादी ही तिचे घरासमोर उभी असतांना आरोपी लिलाधर वंजारी हा तिचे घराचे बाहेर उभा राहून तिला पैसे दाखवुन अश्लिल चाळे केले. तु माझे सोबत चल, मी तुला पैसे देतो असे म्हणुन तिचा विनयभंग केला. आरोपी



फिर्यादीच्या जवळ येत असल्याचे पाहुन तिने त्याला ढकलुन दिले, त्यामुळे त्याने फिर्यादीला शिविगाळ केली, अशा तक्रारीवरुन पोलिसांनी पोलिसांनी लिलाधर किसन वंजारी रा.चांदस याचे विरुध्द कलम ७४ भा.न्या.सं.सहकलम ३, १ आर., ३, १ एस.अजाज, अप्रका अन्वये गुन्हा दाखल करुन अटक केली आहे.

# भीषण अपघातात उद्योजकासह दोघांचा जागीच मृत्यू : परिसरात हळहळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – अहिल्यानगर महामार्गावर शिरूर बायपासजवळ मंगळवारी भीषण अपघाताची घटना घडली. मंगळवारी सायंकाळी कंटेनर, कार, दुचाकी आणि बसच्या भीषण अपघातात वाडेगव्हाणच्या सरपंच प्रियंका यादव यांचे पती व उद्योजक किशोर नामदेव यादव आणि दुचाकीस्वार प्रथमेश प्रकाश लाड यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबावर मोठा आघात झाला आहे भरधाव कंटेनरची कारला धडक, दोघांचा मृत्यू मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, किशोर यादव हे कारने शिरूरला आले होते. हॉटेल संग्राससमोरून यू-टर्न घेत असताना दुभाजकाजवळ प्रथमेश लाड




दुचाकीसह थांबले होते. त्यावेळी मागून आलेल्या भरधाव कंटेनरने कारला धडक दिली. कार दुचाकीवर आदळल्यानंतर छत्रपती संभाजीनगरकडे जार्णाया शिवाई बसने कार व दुचाकीला धडक दिली. या धडकेत कारच्या पुढील भागाचा चक्काचूर होऊन किशोर यादव यांचा, तर कार व बसमध्ये चिरडल्याने प्रथमेश लाड यांचा मृत्यू झाला. कंटेनरचालक कंटेनरसह फरार दरम्यान, कंटेनरचालक कंटेनरसह फरार झाला असून, याप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरु आहे.

# पाच वर्षांत महाराष्ट्रात ३६,००० पेक्षा जास्त कंपन्या बंद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – गेल्या पाच आर्थिक वर्षांत महाराष्ट्रातील ३६,००० हून अधिक खाजगी कंपन्यांचे अवसायन किंवा त्यांची नावे नोंदणीवरून वगळण्यात आल्याची माहिती लोकसभेत समोर आल्यानंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शासनाचा अतिहस्तक्षेप, वाढता भ्रष्टाचार



आणि व्यवसायासाठी प्रतिकूल बनत चाललेले वातावरण यामुळेच महाराष्ट्रातील व्यावसायिक व औद्योगिक घडामोडी इतरत्र स्थलांतरित होत असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. शिवसेना पक्षाचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने १० ऑगस्ट रोजी ही आकडेवारी लोकसभेत सादर केली. व्यवसाय सेवा क्षेत्रातील १४,००० हून अधिक आणि उत्पादन क्षेत्रातील जवळपास ६,५०० कंपन्या बंद पडणे अत्यंत चिंताजनक आहे, कारण हे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करतात.

# पेपरबोर्ड आयतीवर अँटी-डम्पिंग शुल्क लावा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – इंडोनेशियातून होणाऱ्या काही पेपरबोर्ड उत्पादनांच्या आयतीवर तातडीने अँटी-डम्पिंग शुल्क लागू करण्याची मागणी 'इंडियन पेपर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन'ने सरकारकडे केली आहे. स्वस्त दरातील या आयतीमुळे स्थानिक उत्पादकांना २४२ कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागल्याचा दावा संघटनेने केला



आहे. बुधवारी जारी केलेल्या निवेदनात आयपीएमएने नमूद केले की, 'डायरेक्टरेट जनरल ऑफ ट्रेड रेमेडीज'ने डम्पिंग सिद्ध केले असून त्यावर दंडात्मक शुल्क लादण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे इंडोनेशियातून येणाऱ्या वर्जिन मल्टी-लेयर पेपरबोर्डवर त्वरित अँटी-डम्पिंग शुल्क लागू करण्यात यावे. कमी किमतीच्या आयतीवर अंतरिम उपाय म्हणून लादण्यात आलेल्या 'किमान आयात मूल्याची' मुदत ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपत असल्याने या विषयाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. इंडोनेशियातून वर्जिन मल्टी-लेयर पेपरबोर्डची आयात आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ६२,९३५ टनांवर पोहोचली आहे.

# न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्यावरील आरोप सिद्ध : संसदेत चौकशी समितीचा अहवाल सादर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – न्यायाधीशांच्या अधिकृत निवासस्थानी जळित नोटांची बंडले सापडल्याप्रकरणी वादात सापडलेले माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील सर्व आरोप संसदेने स्थापन केलेल्या चौकशी समितीने सिद्ध झाले असल्याचे स्पष्ट केले आहे.

लोकसभा अध्यक्षांच्या आदेशानुसार गठित करण्यात आलेल्या तीन सदस्यीय समितीचा हा



सर्वसमावेशक अहवाल बुधवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये औपचारिकरीत्या मांडण्यात आला. प्रकरणाची पार्श्वभूमी व तीन प्रमुख आरोप: मार्च २०२५ च्या मध्यात, दिल्लीतील अधिकृत निवासस्थानी आग लागल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या गंभीर प्रकारानंतर न्यायव्यवस्था वतुर्ळात मोठी खळबळ उडाली होती. या पार्श्वभूमीवर, सुमारे दोनशेहून अधिक खासदारांनी स्वाक्षरी करत केलेल्या मागणीनुसार, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी न्यायाधीश (चौकशी) कायद्यांतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती नेमली.

